**Q.P. Code:00006903**

**[वेळ : ३ तास ]** **[गुण : १००]**

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** ‘कादंबरी’ या साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करून त्याच्या प्रमुख घटकांची चर्चा करा. २०

**किंवा**

**ब.** ‘कादंबरी’ या साहित्यप्रकाराच्या स्वरूपावरून पडणाऱ्या विविध प्रकारांची विस्ताराने ओळख करून द्या.

**प्र. २ अ.** ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखांच्या स्वभावविशेषांचा वेध घ्या. २०

**किंवा**

**ब.** ‘थँक यू मिस्टर ग्लाड’ या कादंबरीतील निवेदनव्यवस्था आणि भाषाउपयोजनेच्या स्वरूपाची मांडणी करा.

**प्र.३ अ.** ‘दिवे गेलेले दिवस’ या कादंबरीतील आशयसूत्रांचा उलगडा करा. २०

**किंवा**

**ब.** ‘दिवे गेलेले दिवस’ या कादंबरीतील राजकीय संदर्भांची सोदाहरण चर्चा करा.

**प्र.४ प्रत्येक गटातील एक टीप लिहा. (एकूण तीन)** ३०

**अ. १.** कादंबरी साहित्यप्रकाराच्या उदयाची पार्श्वभूमी

**किंवा**

**२.** कादंबरीची निवेदनव्यवस्था

**ब. १.** ‘थॅंक यू मिस्टर ग्लाड’ कादंबरीतील विविध कैदी

**किंवा**

**२.** ‘थॅंक यू मिस्टर ग्लाड’ या कादंबरीतील वातावरण



XSAGARDADMINY908115XSAGARDADMINY908115

**क.** १. 'दिवे गेलेले दिवस' मधील निवेदक 'मी'

**किंवा**

२. 'दिवे गेलेले दिवस' मधील समाजवादी म्हातारा

**प्र.५** पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही पाच)** **१०**

अ. कादंबरीत चित्रित झालेल्या नक्षलवादीस कोणती शिक्षा देण्यात आली होती?

आ. 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील जेलरच्या मुलीचे नाव काय?

इ. 'थँक यू मिस्टर ग्लाड' कादंबरीतील वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोत्तम डॉक्टर अशी कोणाची ओळख होती?

ई. वीरभूषण पटनाईक यांना कोणत्या जेलमध्ये ठेवले गेले होते?

उ. रंगनाथ पठारे यांनी 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीमध्ये कोणता काळ जिवंत केला आहे?

ऊ. मिस मेहताब या मूळच्या कोणत्या राज्यातील आहेत?

ऋ. भास्करराव बेंडे यांना कोणत्या पक्षाकडून विनासायास तिकीट मिळाले?

ऌ. कोणती शिबिरे यशस्वी होण्यासाठी राज्यकर्त्या पक्षाचे नेते-कार्यकर्ते आपली ताकद वापरतात?

*************************



XSAGARDADMINY908115XSAGARDADMINY908115